वासना आक्रसते | प्रवृत्तीला ओहोटी लागते | मन उबगते | सुखाला | २११|१४|ज्ञा.

दहाव्या अध्यायात सांगितलेल्या स्त्री लिंगी विभूतिपैकी स्मृति नावाच्या विभूति बद्दल हे विवेचन चौदाव्यातले आहे. वरच्या ओवीतल्या वासना ह्या शब्दाने दचकू नका कारण त्या संस्कृत शब्दाचा अर्थ स्मृति किंवा आठवणी असा आहे. माणूस या जगात राहतो आणि तिथे तो काहीतरी करत असतो त्याला प्रवृत्त होणे असे म्हणतात. ह्या प्रवृतीसाठी मुळात त्याच्यातली जैविक उर्जा कारणीभूत असते. आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींमुळेही माणूस प्रवृत्त होतो परंतु त्यांच्या अनेक कृति आठवणींवरही अवलंबून असतात. स्मृतिपटल नावाची एक गोष्ट असते त्या फळयावर अनेक घटनांची गर्दी असते. त्यातल्या काही माणसाला स्पष्टपणे आठवतात. त्यातून जे निणर्य कधीकाळी घेतले गेले असतात तो आकृतिबंध माणसाला प्रवृत्त होण्यास मदत करतो. मुलगी सासरी जाताना आईच्या डोळयात नाही म्हटले तरी पाणी तराळते तेव्हा ती स्वतः सासरी गेली त्यावेळचीही आठवण असते. त्या डोळयातल्या पाण्यात दोन मिश्र भाव असतात. एक तर आता भेटी कमी होणार हा एक भाग आणि आपली मुलगी आता स्वतंत्रपणे आपले आयुष्य जगणार हा दुसरा भाग. पहिल्याला दुःखाची किनार असते आणि दुसऱ्यात सुखाचा स्पर्श असतो. आणि त्यात आई आपल्याही आठवणी जागवते. अमक्या तमक्याने माझा अपमान केला, मला वाव दिला नाही, माझ्यावर अन्याय केला असल्या आठवणींमध्ये डूक धरणे, बदला घेणे, किंवा आकस अशा गोष्टींची नोंद होऊ शकते. स्मृति ही गोष्ट एक दुधारी शस्त्र असते. त्यातून शिकता येते किंवा तिच्या आधारावर दुसऱ्याला धडा शिकवण्याची प्रवृत्तीही निर्माण होऊ शकते. महाभारतातले "आता तुला धर्म आठवला का? द्रौपदीची विटंबना झाली तेव्हा तुझा धर्म कुठे गेला होता? हे कर्णाला सुनावले गेलेले वाक्य दुसऱ्या प्रकारात मोडते. आठवणींवर आधारित संस्कार घडतात. माणूसजात आठवणीचा संचय करून जे शिकते आणि नमूद करते त्याला इतिहास म्हणतात आणि ह्या इतिहासातल्या अनुभवावरून कायदे केले जातात त्याला म्हणूनच स्मृतिग्रंथ म्हणतात. आपल्या प्रजासत्ताकाची घटना किंवा संविधान एक स्मृतिग्रंथ आहे. त्यात बदल करतात कारण इतिहास आपल्याला सतत शिकवत असतो. प्रवृत्त माणूस नेहमीच सुखदुःख अनुभवतो. ही सुखदुःखाची जोडी एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. सुखाचे नास्तित्व म्हणजे दुःख असते. सुखाचा उबग आला तर मग दुखाचा उगम होत नाही. आठवणींवर आधारित हे द्वंद मग संपते आणि माणूस प्रवृत्तपणे कार्य करत राहिला तरी तो मग अंतर्मनात निवृत्त होतो. इथे ह्या विधानात स्मृति किंवा कायदा नसतो. इथे स्वेच्छेने स्वीकारलेली एक वृत्ति असते. आणि ही वृत्तीही आठवणींच्या आधारे प्रसूत पावते.

३५० शब्द

rlthatte@gmail.com

तैसी देशी आणि संस्कृत वाणी | एका भावार्थाचा सोकासनी | शोभती आयणी | चोखद आईका || ४५|१०|ज्ञा.

मराठी आणि संस्कृत वाणी (भाषा, वाचा) या दोन्ही एकच अभिप्राय (निर्णय) सांगतात. एकाच पालखीत शोभतात. त्या तुम्ही चांगल्या बुद्धीने ऐका असे ज्ञानेश्वर दहाव्याच्या प्रस्तावनेत म्हणतात. तिथली ही ओवी. भाषा वाचा आणि वाणी ह्या गोष्टी बुद्धी आणि स्मृति ह्या स्त्रीलिंगी विभूतींच्या हातात घालून माणसाच्या आयुष्यात निर्माण होत गेल्या आहेत. पृथ्वीवरचे सर्व स्तरातले इतर प्राणी एकमेकांना निरोप पाठवतात त्यात अनेक निरोप ध्वनीच्या सहाय्याने पाठवले जातात. काही हातवाऱ्यांवरूनही कळतात परंतु पक्षी आवाज काढत असले तरी त्याला मर्यादा असतात. माणसाचे तसे नाही. वाणी नुसती वाणी राहत नाही तर त्याची गाणी होऊ शकतात, वाचेचा दुरुपयोग झाला तर त्याला वचवच म्हणतात. इतर कितीही प्रकारचे गुणी लोक असोत परंतु चांगला वक्ता दहा हजारात एखादाच असतो असेही संस्कृत सुभाषित आहे. तो वक्ता हा शब्द वाचा ह्या शब्दावरून आला असणार. भाषा ह्या शब्दावरून भाष्य हा शब्द अवतरतो. एखाद्या विषयावर मार्मिक आणि मातबर लिहिणे किंवा सांगणे म्हणजे भाष्य. अनेक अर्थाने बुद्धी आणि स्मृती यांचे मिश्रण आणि स्थित्यंतर भाषेमधे घडते. मेंदूमधल्या विद्युत रासायनिक क्रिया बुद्धीला आणि आठवणींना जन्म देतात मग त्यातून व्यक्त व्हायचे असेल तर हीच क्रिया श्वसनाद्वारे वाऱ्याचा प्रवाह कमी जास्त करत ध्वनीयंत्राच्या मदतीने ध्वनि प्रसूत करते तो ध्वनि गळयातून तोंडापर्यंत आल्यावर टाळूचा मृदूभाग उचलला जातो. गळा आणि तोंडाची एक बंदिस्त पेटी तयार होते. ओठ मिटलेले असतांना इथला दाब वाढतो मग वाफेच्या इंजिनाप्रमाणे हा ध्वनी जेव्हा सुटतो तेव्हा ओठ बंद उघड केले तर प होतो. दाताला जीभ लावली तर त होतो, टाळूला जीभ लागली तर ख होतो. निरनिराळया ध्वनींची वर्णमाला असते. ती लिहिली गेली तर त्याला लिपी किंवा बाराखडी म्हणतात. अशा तऱ्हेने वाचा वाणी किंवा भाषा नावाचे एक अमोघ अस्त्र निर्माण होते. हे अस्त्र अनेकांना हेलावू शकते, समोरच्या व्यक्तीला प्रेमात पाडू शकते, इतरांना दुखवू शकते आणि हे अस्त्र जर म्यान करून मौन निर्माण झाले तर तेही मोठे अर्थपूर्ण असते. नेहमीची बोलकी बायको जर गप्प बसली तर समजावे की स्वारी रुसली आहे आणि आपले काहीतरी चुकले आहे. थोर मंडळी गप्प बसली तर समजावे की जो प्रश्न विचारला गेला आहे. त्याला मुळात उत्तरच नाही किंवा जर उत्तर असेल तर ते समजण्याची आपली लायकी नाही. हीच ती मधून मधून गप्प बसणारी वाचा नावाची स्त्रीलिंगी विभूति.

३५४ शब्द

rlthatte@gmail.com